धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

पवित्र तास - शुक्रवार ०३ मे २०२४

गायन ः भजतो तुला भक्तीने ......

प्रिय बंधूभगिनींनो, या शांत समयी सर्व कामे बाजूला ठेवून या साक्रामेंतातील ख्रिस्ताचे आभार मानण्यासाठी व त्याची स्तुती आराधना करण्यासाठी आपण एकत्र जमलो आहोत. प्रभो, आमचे मन व हृदय तुझ्या ठायी एकाग्र करण्यासाठी आम्हाला मदत कर. सर्व प्रकारच्या विवंचनेपासून आम्हाला दूर ठेव. सर्व चराचराला भेदून आरपार जाण्या-या तुझ्या दिव्य प्रकाशात शांत व भक्तीपूर्वक राहण्यास आम्हाला मदत कर. तुझ्या प्रेमाने व ममतेने आमची हृदये भरून काढ. सर्व आनंद व शांतीच्या उगम असणा-या हे प्रभो, तुझा आनंद व शांती यांचा आमच्यावर वर्षाव कर. आमच्या जीवनातील सर्व सुख दुःखे, आजारपण, अडचणी व समस्या ह्यांचा स्वीकार करण्यास आम्हाला कृपा दे. तुझ्या आज्ञाचे पालन करण्यास आम्ही नेहमी तत्पर असावे व त्याद्वारे आमचे जीवन तुझ्या इच्छेप्रमाणे ठेवण्यास व तुझ्यामध्ये राहून शाश्वत फळ देण्यास आम्हाला सहाय्य कर.

जगाच्या आरंभापासूनच तू आमच्यावर प्रेम केले आहे. आमच्या तारणासाठी स्वतःचे बलिदान करण्यास तू या धरतीवरती जन्म घेतलास. होय प्रभो, तेच तुझे मिशन कार्य होते. आम्हाला शिक्षण देणे, आमचे आजार दूर करणे, आमच्यावर प्रेम करणे आणि आमच्यासाठी स्वतःचे बलिदान करणे हेच तुझे जीवन ध्येय होते. आम्हाला पापमुक्त करण्यासाठी तू स्वतःचे रक्त खंडणी म्हणून अर्पण केलेस. तुझ्या दुःखसहनापूर्वी तू आपल्या सर्व शिष्यांना एकत्र बोलावलेस व त्यांनी तुझ्याबरोबर एक व्हावे म्हणून तू त्यांच्यासाठी तुझ्या परम पित्याकडे प्रार्थना केलीस. आम्ही सर्वांनी तुझ्या प्रार्थनेप्रमाणे एक व्हावे म्हणून तू आम्हाला कृपा दे. तुझ्या मरणाने व पुनरूत्थानाने तू मानव जातीचा देवाबरोबर समेट घडवून आणलास. तुझ्या प्रेमाला आम्ही नेहमी सकारात्मक प्रतिसाद द्यावा म्हणून तू आम्हाला मदत कर.

*शांतता*

गायन ः परस्परांवर प्रेम करा ..... (वसुंधरे गा गीत कमांक ९५)

बायबल वाचन ः **१ करिंथ १५ ः १ ते ८**

चिंतन ः तू मेलेल्यातून उठून पुष्कळांना दर्शन दिलेस ह्या आनंददायी प्रसंगावर ह्या पुनरूत्थान काळात आम्ही मनन चिंतन करीत आहोत. तुझ्या दुःखसहनाने आणि मृत्यूने तुझ्या प्रेषितांवर निराशेची अवकळा पसरली होती. सर्व काही संपले असे त्यांना वाटत होते. त्यांच्या सर्व आशेवर पाणी फिरले होते. पण तुला परत जिवंत झालेले पाहून ते उल्हासित झाले. आपल्या विश्वास व्यर्थ नव्हता ह्याची त्यांना खात्री पटली. ख्रिस्त खरोखरच मेलेल्यातून उठला आहे ह्याविषयी कोणाला शंका वाटत असेल तर तो ५०० हून अधिक लोकांना दिसला, त्यांना त्याने दर्शन दिले, त्यांनी त्याला न्याहाळले ह्याचे स्मरण करावे. येशूने आपल्याला दमासकसच्या रस्त्यावर दर्शन देऊन त्याच्या पुनरूत्थानाचे साक्षीदार केले यामुळे संत पॉल स्वतःला धन्य मानून परम आनंद

व्यक्त करतात. त्याच्या प्रेमाची आज्ञा पाळण्यास त्याचे पुनरूत्थान आपल्यासाठी पुरेसे नाही का? आपल्याला अजून काही पुराव्याची गरज आहे का ह्याचा आपण गंभीरपणे विचार करावयास हवा.

*शांतता*

**गायन** ः करितसे मी नवीन सारे ....... . (वसुंधरे गा गीत कं.२७३)

**बायबल वाचन** ः **योहान १४ ः ६ ते १४**

**चिंतन** ः जुन्या करारात आपण वाचतो की परमेश्वराने संदेष्ट्यामार्फत लोकांना दर्शन दिले तो त्यांच्याबरोबर बोलला. त्याचे आदेश त्यांच्यामार्फत त्यांने त्यांना दिले. पण नव्या करारात आपण पाहतो की देवाने खुद्द आपल्या पुत्रामार्फत स्वतःचे दर्शन दिले व तो आपल्याबरोबर त्याच्याद्वारे बोलत आहे. जुन्या करारात म्हटले आहे की जो कोणी देवाला पाहील तो जिवंत राहणार नाही. देवाला पाहून त्याच्याबरोबर बोलून फक्त मोझेसच जिवंत राहिला आहे. पण नव्या करारात सर्व काही बदलले आहे. प्रभू येशूच्या बलिदानाने व पुनरूत्थानाने सर्व जुन्याचा -हास होऊन आपण एक नवीन उत्पत्ती झालो आहोत. देवाला समोरासमोर पाहून मरणाची भीती आपल्यात राहिली नाही. ख्रिस्त हा 'इम्यानुयेल' - आपणामध्ये देव असा आहे. तो फक्त देवच नाही तर तो आपला मित्र व बंधू बनला आहे. त्याने सर्वकाही आपल्याला सांगितले आहे. तो आपल्याला दास म्हणत नाही तर मित्र म्हणतो कारण मित्राला सर्वकाही ठाऊक असते. त्याने आपल्याला फक्त बंधू म्हणून मानले नाही तर आपल्याला त्याच्याबरोबर स्वर्गराज्याचे वारसदारही केले आहे. त्याच्या बलिदानाने त्याने आपल्याला तारणाचे अभिवचन दिले आहे.

प्रभूच्या बलिदानाला प्रतिसाद म्हणून आपण काय करावयास तयार आहोत ?

*शांतता*

**गायन** ः प्रभू मज तव आधार हवा ......... (वसुंधरे गा गीत कमांक १0९)

**विनंत्या**

**प्रतिसाद** ः प्रभो, आमची प्रार्थना ऐक.

१. आपले पोप फान्सिस, आर्चबिशप फेलिक्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना प्रभूच्या विजयाचा संदेश जगभर पसरविण्यासाठी पवित्र आत्म्याचे सामर्थ्य व चांगल्या आरोग्याची देणगी लाभावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. आपले राजकीय नेते व अधिकारी ह्यांनी त्यांना मिळालेला अधिकार हा जनतेकडूनच आहे ह्याचे भान ठेवून सामान्य लोकांच्या हितासाठी निःस्वार्थीपणे कार्य करावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. सर्व ख्रिस्ती पंथानी आपल्यातील मतभेद विसरून एक कुटुंब व एक कळप म्हणून प्रभू येशूच्या नावाने एकत्र येऊन नेहमी प्रेमाचा व न्यायाचा मार्ग निवडण्यास धैर्याने वाटचाल करावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. सर्व विद्यार्थ्यांनी या रजेच्या काळात आपला वेळ नवीन गोष्टी आत्मसाद करण्यास व आपल्यात असलेल्या कलेचा विकास करण्यात घालवावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. आपण आपल्या वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

**शेवटची प्रार्थना** ः हे प्रभो, हे जे काही क्षण तुझ्या संगतीत घालविण्यासाठी आम्हाला दिलेत त्याबद्दल आम्ही तुझे आभार मानतो. आम्ही एकमेकांवर प्रेम करावे व एकमेकांना क्षमा करावी म्हणून तू आम्हाला आशीर्वादित कर. आजारी, एकाकी, गरीब, दुर्लक्षित, बेकार अशा ज्या लोकांना आमची खरोखर गरज आहे अशा गरजवंताना मदत करण्यासाठी आम्ही नेहमी पुढे यावे म्हणून तू आम्हाला कृपा दे. विशेषकरून तुरूंगातील निरपराध गुन्हेगार, कामाच्या ठिकाणी पिळवणूक होणारे कामगार, बालकामगार, असाध्य रोगांनी पीडलेले, मनोरूग्ण व शारीरिक व्यंग असलेले, ज्यांची काळजी घेण्यास कोणीच नाही, अशा सर्वांना आम्ही मदतीचा हात पुढे करावा म्हणून आम्हाला धैर्य दे. तुझ्या वचनावर व आज्ञेवर मनापासून प्रेम करण्यास व त्यांचे योग्य पालन करण्यास आम्हाला प्रेरणा दे. तुझे वचन आमच्यासाठी नेहमी दीपस्तंभ म्हणून उभे ठेव. हे पवित्र मरिये प्रभुच्या पुनरूत्थानाने तू आनंदीत झालीस. आम्ही प्रभूला अभिप्रेत असे बनावे म्हणून तू आमच्यासाठी मध्यस्थी कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू येशूच्या नावाने करतो. आमेन.

**साक्रामेंताचा आशीर्वाद**

**गायन** ः जय जय इशाला ........ (वसुंधरे गा पान नं. २५५)

**शेवटचे गीत** ः श्री येशू भगवान .... (वसुंधरे गा गीत क्र. ३०२)